International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# इमॅजिनरी' कथासंग्रहातील महानगरीय जीवनाचे चित्रण

**प्रा. डॉ. सुनिता पांडुरंग सुर्यवंशी**
सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय,
नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर.
**Email;** -sunitagandhale@gmail.com
Corresponding Author: प्रा. डॉ. सुनिता पांडुरंग सुर्यवंशी
DOI- 10.5281/zenodo.17131682

**प्रास्ताविक**

महानगरातील जीवन हे अनेकदा गतिमान, आव्हानात्मक आणि गुंतागुंतीचे असते. महानगरातील वेगवान जीवनशैली, कामाचा ताण, वेळेचे बंधन आणि त्यातून येणारे मानसिक ताणतणाव कथांमध्ये प्रभावीपणे मांडले जातात. प्रचंड गर्दी असूनही व्यक्तीला येणारा एकटेपणा, नात्यांमधील दुरावा आणि स्वतःला हरवल्याची भावना हे महानगरीय जीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे.

**महानगरीय साहित्य संकल्पना**

ही संकल्पना खूप व्यापक आणि विस्तृत आहे. या संकल्पनेत अनेक पैलू आहेत. ते पैलू नीटपणे अभ्यासल्यानंतर काही एक महानगरीय साहित्याची प्रेरणा, स्वरूप, वैशिष्ट्ये यांची अभ्यासांती मांडणी करता येते. महानगरीय साहित्य' या शीर्षकातच आंतरज्ञानशाखीय अभ्यास अपेक्षित आहे असे दिसते. 'महानगरीय साहित्य' या संकल्पनेची मांडणी समाजशास्त्र, नागरिकशास्त्र व साहित्य या तिन्ही ज्ञानशाखांशी समक्ष राहून करावी लागते. तसेच साहित्यकृतीमध्ये व्यक्त झालेल्या कोणत्या प्रकारच्या वास्तवाला, कोणत्या अनुभवाला महानगरीय म्हणायचे हे ठरवून ही संकल्पना स्पष्ट करावी लागेल. 'महानगरीय साहित्य' हा शब्दप्रयोग प्रथम विद्यापीठातील अभ्यासक्रम निश्चित करणाऱ्या अभ्यासकांनी केला. पदवी व पदव्युत्तर स्तरावर मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रवाहांचे अभ्यासक्रम निश्चित केले जातात.

साहित्याच्या विश्वामध्ये नव्यानेच निर्माण झालेल्या आणि काही वेगळी गुणवैशिष्ट्ये घेऊन जन्माला आलेल्या साहित्याला त्याचे वेगळेपण ठरविण्यासाठी, त्याची ओळख अधोरेखित करण्यासाठी त्या प्रवाहांना अभ्यासक विशिष्ट प्रकारची नावे देत असतात. हे नामकरण करताना त्या साहित्याची वैशिष्ट्ये ही त्या नामकरणातून निर्देशित व्हावित असा हेतू असतो. म्हणूनच आपल्याकडे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी अशी नावे साहित्यातील प्रवाहांना दिलेली आढळून येतात. तसाच काहीसा प्रकार 'महानगरीय साहित्य' असे नामाविधान करण्यापाठीमागे असावा असे वाटते. पण कोणत्या साहित्याला महानगरीय साहित्य म्हणावे हा एक प्रश्नच आहे, कारण ज्या प्रकारे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्य प्रवाहातून दलितत्व, ग्रामीणत्व, स्त्रीत्व विशिष्टत्व प्रकट होते तसे प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्रातील विविध महानगरांमध्ये निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक समस्यांची चर्चा तिथल्या अनुभवविश्वाचा अविष्कार त्या त्या महानगरातील साहित्यिक, कलावंतांनी आपापल्या साहित्य कृतींमधून वेळोवेळी केलेला आहे. महानगरीय कथाकारांनी शहरातील घराची समस्या, वाहतूक समस्या, एकाकीपण, परकेपणा, विलाशी संस्कृती, स्त्री पुरुष भेदभाव, आर्थिक संकटे, भ्रष्टाचाराचे वातावरण, स्त्री-पुरुष संबंध, असुरक्षिततेची भावना, कॉल गर्ल्स आणि

वेश्या समस्या, लोकसंख्येतील वाढ, औद्योगीकरण, बेरोजगारीची समस्या, महिलांच्या परिस्थितीतील बदल, जातियवाद विविध प्रकारची प्रदूषणे, नातेसंबंधांमध्ये आलेला परकेपणा, नैतिक मूल्यांचा ह्रास अशा अनेक समस्यांना आपल्या कथांचे विषय बनविलेले आहे.

**महानगरीय साहित्याचे स्वरुप व वाटचाल**

1990 नंतर महानगरीय जीवनामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक दृष्ट्या प्रचंड बदल होत गेले. शेती, शेतीमधील पद्धती, दुष्काळ, पूर यामुळे निर्माण झालेले कर्जबाजारीपण त्यातून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या त्यातून शहरांकडे होणारे स्थलांतर. शहरांमध्ये मॉल्स, आय. आय. टी. कंपन्या, बहुराष्ट्रीय कंपन्या, आर्थिक धोरणावर आधारलेले सरकारी धोरणे याचा परिणाम संपूर्ण मानवी जीवनावर झाला. एकीकडे इंटरनेट, मोबाईल, प्रचंड वेगवान संपर्काची साधने, त्याचवेळी जातीवाद, प्रांतवाद, भाषावाद, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार अशा एकीकडे प्रचंड श्रीमंती तर दुसरीकडे प्रचंड गरिबी, चंगळवाद, फुटपाथवर जगण्यासाठी माणसांची चाललेली धडपड अशा अनेक प्रश्नांचा गुंता घेऊन समाज जीवन उभे होते. या समाज जीवनाचा वेध विविध मराठी कवींनी आपल्या कवितांमधून घेतलेला आहे.

**इमॅजिनरीचे स्वरुप व वैशिष्ट्ये लिहा.**

'रचना' हे इमॅजिनरी या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. आजकालचं धावपळीचं शहरी जग, कुठेतरी हरवलेला निवांतपणा, वातावरणात असलेलं अदृश्य ताण आणि या सगळया चक्रात सापडलेले महानगरी जगात वास्तव्यास असणारे लोक असे सगळे घटक या 12 कथांमधे आहेत. कुठे वडील आणि मुलाचं नातं आहे, जे एकीकडे हळवं आहे तर दुसरीकडे टोकदार आहे. कधी या कथांमधून मध्यमवयीन स्त्री पुरुषांच्या समस्या सामोऱ्या येतात तर कधी या कथा शाळा-कॉलेजमधे असणाऱ्या मुलांच्या मनाची अस्वस्थ स्पंदने टिपतात. यातल्या कथा गुंतागुंतीची मने आणि एकंदर विचारप्रक्रिया उलगडू पाहतात. भावनिक पातळीवर वाचकाला विचार करायला लावतात.

काही काळापुरतं अस्वस्थ करणारी. गणेश मतकरींच्या कथेत शहरी बोलीभाषा असली, ती भाषा वाचण्याकरता सुलभ असली, तरीही, या कथा त्यातल्या पात्रांच्या मनोव्यापारात खोलवर शिरतात. त्यांची 'सायकी' उलगडायचा प्रयत्न करतात. बारीकसारीक तपशीलांसकट एखादी वास्तू अथवा परिसर उभा करतात. रचना तत्वाशी खेळतात. वाचकाला विचार करायला लावतात. कधी बुचकळ्यात पाडतात, तर कधी धक्के देतात. 'कदाचित इमॅजिनरी' हा कथासंग्रह, पारंपारिक संकल्पनेप्रमाणे वाचकांची करमणूक करत नाही. तो त्यांच्या बुद्धीला खाद्य पुरवतो. ताकदीने उभ्या केलेल्या कथांमधल्या पात्रांच्या विविध समस्यांवर विचार करायला लावतो. बारा कथांचा हा संग्रह, शहरी भागात वास्तव्यास असणाऱ्या विविध वयोगटांच्या व्यक्ती आणि त्यांचे स्वभाव यांचे अनेक पैलू दाखवतो. समकालीन घटना आणि मनोभूमिकेवर प्रकाश टाकतो. रुळलेली वाट सोडून स्वतःची वेगळी वाट आखतो आणि त्यावरून मार्गक्रमण करत राहतो. वेगवेगळ्या दृष्टीकोनामुळे हा नवा कथासंग्रह वाचनीय आहे. या कथासंग्रहाची शक्तिस्थानं शैलीची नवता, निरीक्षणातील सूक्ष्मता, मानवी जीवनातील विरोधाभास आणि लेखनातील चित्रशैलीचं ही आहेत.

**आशयसूत्रे व व्यक्तिचित्रणे**

कथांचे प्रकार, शैली, भाषा, विषय, विचार, रचना इत्यादी गोष्टीत सध्या मोठ्या प्रमाणात बदल घडतो आहे. सध्याच्या कथांना कुठलाही ठराविक असा साचा नाही. त्या वाहत्या आहेत. त्यांना स्वतःचे असे वेगळे आयाम आहेत. सध्याच्या जागतिक अस्थैर्याचा परीणाम कथांमध्येही डोकावू लागला आहे. तुलनेनं, महानगरी भागात हा प्रभाव अधिक प्रमाणात जाणवतो. महानगरात राहणाऱ्या अस्थिर मनांची अस्वस्थता, गणेश मतकरी लिखित 'खिडक्या अर्ध्या उघड्या' या छोट्याशा कादंबरीत आपण जवळून अनुभवली होती. वेगवेगळ्या आकार-प्रकारांच्या व स्वभावांच्या रंगीबेरंगी महानगरीय आयुष्यांचा हा एक रंजक

कोलाज होता. त्यांच्या 'इन्स्टॉलेशन्स' या कथासंग्रहातल्या कथा, आजच्या काळातल्या, शहरी जीवन जगणाऱ्या पात्रांच्या आहेत. यातली पात्रे, ही तुमच्या-आमच्या सारखीच असल्याकारणानं, या कथांशी शहरी भागातला वाचक सहजी एकरूप होतो. या कथांची भाषाही, शहरात ऐकू येते तशी इंग्रजी, हिंदीमिश्रित मराठी आहे. गणेश मतकरींच्या नुकत्याच आलेल्या दुसऱ्या कथासंग्रहात तब्बल 12 कथा आहेत. '(कदाचित) इमॅजिनरी' नावाचा हा कथासंग्रह देखील शहरी जीवनाची पार्श्वभूमी असणारा आहे.

'सायकल'. यातलं पात्र एका 'मेमरी गेम' मधे अडकलेलं आहे. त्याला अधेमध्ये विस्मरण होतं. कधी भूतकाळ आठवतो तर कधी वर्तमानाबद्दल साशंकता वाटते. त्याच्या स्मरणात असलेली, फार पूर्वी घडलेली एक विचित्र घटना, तो नीट आठवायचा प्रयत्न करतो आहे. याकथेमध्ये, केंद्रस्थानी असलेल्या घटना आठवायच्या निमित्ताने, पौगंडावस्थेतल्या मुलांचे प्रश्न चर्चिले जातात. वर्चस्व, अविश्वास, निर्णयक्षमतेवर होणारा परिणाम, दडपणाखाली घेतलेला निर्णय आणि कथेच्या केंद्रस्थानी असणारी आणि कथेच्या मुख्य पात्राला आठवत नसणारी एक घटना या सगळ्याची गुंफण असणारी ही कथा रचनातत्वाच्या दृष्टीने वाचण्याजोगी आहे.

'कासव' ही कथा एक वेगळाच डिलेमा बारीकसारीक तपशिलांसह रेखाटते. शहरी भागात राहणाऱ्या तीन व्यक्तींच्या एका कुटुंबात उद्भवणारी एक समस्या, त्या समस्येच्या दृष्टीकोनातून त्यांनी घेतलेले निर्णय, या निर्णयामुळे सद्य वर्तमानात घडणाऱ्या आणि पूर्वायुष्यात घडून गेलेल्या काही घटनांचं मिश्रण करत करत ही कथा आकार घेते. ही कथा बऱ्यापैकी कंटाळवाणी आहे. घटना तुलनेने कमी आहेत. वर्णनाचा भाग जास्त. वेग कमीतकमी. पण साधारण मध्यावर आल्यानंतर कथा वेग पकडते, घटना वेगाने घडू लागतात आणि शेवटी एका सकारात्मक वळणावर येऊन थांबते. म्हटलं, तर या कथेला ओपन एंड आहे आणि नाही देखील.

'व्हिसलरची आई' ही गोष्ट देखील रचनेच्या दृष्टीनं अभ्यासण्यासारखी. 'व्हिसलर्स मदर' हे कथानायकाच्या स्मरणात असलेलं सुप्रसिद्ध चित्र, प्रत्यक्ष जगातल्या वस्तू, वास्तू आणि व्यक्तींबरोबर या चित्राची कथानायकाच्या मनात होणारी सरमिसळ, त्यानं सहजच घेतलेलं एक छायाचित्र आणि त्यातून उडणारा चमत्कारिक गोंधळ असं या कथेचं सूत्र आहे. प्रत्यक्ष जगात घडणाऱ्या काही कृती, त्या कृतींचे उमटणारे विचित्र पडसाद, तरुणाई, आजच्या तरुणांच्या जगात असणारे संभ्रम, तंत्रज्ञानाच्या प्रगतीने(?) या संभ्रमांमध्ये घातलेली भर इत्यादी गोष्टी या कथेत परिणामकारकपणे येतात. एखाद्या साध्याशा कृतीमुळे घडणारी घटना किती विचित्र असू शकते आणि त्या घटनेचे परिणाम किती गंभीर स्वरूपाचे असू शकतात, याच्या शक्यता दाखवणारी ही कथा रचनातत्वाच्या वैशिष्ट्यामुळे सुरवातीपासून शेवटपर्यंत बांधून ठेवते.

'रिंग' ही एकप्रकारे प्रेमकथा आहे. फक्त ती ठराविक साच्यात बसणारी प्रेमकथा नाही. उगीच भावभावनांचे उमाळे नाहीत. रागलोभ नाहीत. आहेत त्या फक्त घटना आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या आवश्यक तितक्याच भावना. आजूबाजूला रोज घडणाऱ्या घटनांमधेही एक नाविन्य असतं. हे नाविन्य फक्त कथाकार पाहू शकतात. असंच नाविन्य आपल्याला 'रिंग' या कथेत दिसतं. शाळासोबत्यांमधे असणारे नाजुक बंध ही कथा हळुवारपणे उलगडते. आपल्याकडे असणाऱ्या एखाद्या गोष्टीचं आपल्याला खूप महत्व वाटत असतं. इतरांच्या दृष्टीनं मात्र ती गोष्ट तशी किरकोळ असते. पण, जेव्हा आपल्या जवळच्या व्यक्तीला खूप जवळची वाटणारी अशी एखादी गोष्ट हरवते, तेव्हा मात्र ती गोष्ट आपल्याकरताही खूप महत्वाची होऊन जाते. प्रेम, उदासी, त्याग, किंचितशी हुरहूर अशा संमिश्र भावनांची सुरेख गुंफण या कथेत वाचायला मिळते.

'उशीर' ही कथा शाळकरी मुलाचं एकलपण समजावून सांगणारी. रुटीन जीवन जगताना आपल्या आसपास काही घटना घडतात ज्या आपल्याला गोंधळून टाकतात. आपली मानसिक बैठक ढवळून टाकतात. अस्वस्थ करतात. उशीरचा कथानायक, हा अशाच एका खोलवर परिणाम करणाऱ्या घटनेमुळे अस्वस्थ आहे. काही महिन्यांपूर्वीच्या काळात अडकून राहिलेला आहे. जसजसा

काळ सरतो तसतसं त्याला वास्तवाचं भान येतं. ही रूढार्थाने गूढकथा नाही. पण त्याची मांडणी आणि शेवटी अचानक बसणारा आणि चरकवणारा धक्का, लक्षात घेता या कथेला गूढकथाच म्हणावे लागेल.

'कदाचित इमॅजिनरी' एका ओव्हर अँक्शस तरुणाचं चित्र उभी करते. कधीकधी घटना घडायच्या आधीच, काय होणार हे आपण गृहीत धरतो. काय शक्यता असतील किंवा असू शकतील याचा इतरांच्या तुलनेत अधिक विचार करून साशंक असतो. आपल्या विचारात आपण वाईट शक्यतांचा विचार अधिक करतो. प्रत्यक्ष घडणारी घटना तितकी विचित्र असेलसं नाही. 'कदाचित इमॅजिनरी' या कथेचं हेच तत्व आहे.

**समारोप**

महानगरात प्रगतीच्या संधी मोठ्या असल्या तरी, त्याचबरोबर आर्थिक संघर्ष, स्पर्धा आणि यश मिळवण्यासाठीची धडपड यांचे चित्रण केले जाते. महानगरे ही विविध संस्कृती, भाषा आणि जीवनशैलीच्या लोकांचे मिश्रण असतात. या विविधतेतून येणारे अनुभव, संघर्ष आणि सामंजस्य कथांमध्ये दर्शविले जाते. प्रदूषण, वाहतूक कोंडी, जागेची कमतरता, गुन्हेगारी यांसारख्या महानगरातील समस्या आणि त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम देखील कथांचा भाग असतो. महानगरात येऊन मोठी स्वप्ने पाहणारे आणि ती पूर्ण करण्यासाठी संघर्ष करणारे लोक, तसेच त्यांच्या स्वप्नांची आणि वास्तवाची सांगड घालताना येणाऱ्या अडचणींचे चित्रण केले जाते. मोबाईल फोन, इंटरनेट आणि आधुनिक तंत्रज्ञान हे महानगरीय जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांचा मानवी नातेसंबंधांवर आणि दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम कथांमध्ये दिसून येतो.

**संदर्भग्रंथ**

1. इमॅजिनरीः गणेश मतकरी, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, 17 नोव्हेंबर, 2018.
2. जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य:- संपा. नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, सायन प्रकाशन, पुणे.
3. १९८० नंतरचे मराठी साहित्यः स्वरूप आणि समीक्षाः- संपा. जयद्रथ जाधव आणि भरत देशमुख, अरूणा प्रकाशन लातूर.